# देगलूर महाविद्यालयात उन्हाळी २०२२ विद्यापीठीय परीक्षा सुरळीत

देगलूर - देगलूर महाविद्यालयात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र उच्च शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयामुळे ऑफलाईन (प्रत्यक्ष पद्धतीने) कागद आणि पेन या आधारे दोन वर्षांच्या खंडानंतर संपूर्णतः लेखी परीक्षा होत आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने दिलेल्या उन्हाळी परीक्षा - २०२२ च्या परीक्षा केंद्रावरील परीक्षा सुरळीतपणे चालू आहेत. विद्यार्थ्यांचा अतिशय शिस्तीत आणि शांततामय प्रतिसाद मिळत आहे परीक्षा दालनात गैरमार्गांना आळा घालण्यासाठी अंतर्गत दक्षता पथकाकडून कडक तपासणी करण्यात येत आहे. देगलूर महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर देगलूर महाविद्यालय, देगलूर, वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर आणि सिंधू कॉलेज ऑफ आय. टी. देगलूर या तीन महाविद्यालयांचे दररोज जवळपास १२०० परीक्षार्थी सकाळ व दुपारच्या सत्रात परीक्षा देत आहेत. या परीक्षेत केंद्र प्रमुख म्हणून प्रा डॉ विठ्ठल जंबाले आणि सहकेंद्रप्रमुख म्हणून डॉ चौंडीकर पी. एन. आणि सहायक केंद्रप्रमुख डॉ. बी. एस. नरवाडे प्रा. काळे व्ही. एन. हे कार्यरत आहेत. वरिष्ठ लिपिक श्री प्रशांत चौहाण, श्री अशोक मामीडवार, आणि इतर शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अशोक टिपरसे, दक्षता पथकातील डॉ. किशन सुनेवार, डॉ. नीरज उपलंचवार, डॉ. संतोष येरावार आणि महिला दक्षता पथकात प्रा.सौ. गायकवाड पी. जी., प्रा.सौ. नेरकर एस. एस., प्रा.सौ. रेणुका घाडे, डॉ. शेख परवीन इतर महाविद्यालयीन प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी श्री. नागराज कोतुरवार, श्री मारोती सोनकांबळे, श्री पांडुरंग कदम, श्री पांडुरंग जाधव आणि श्रीमती तिम्मलवार एस.एस. हे सर्व परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव, शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, कोषाध्यक्ष विलास तोटावार, सहसचिव श्री सूर्यकांत नारलावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, देवेंद्र मोतेवार, रविंद्र अप्पा घाडे, गंगाधरराव जोशी, डॉ. कर्मवीर उन्नग्रतवार,. जनार्दन चिद्रावार, चंद्रकांत नारलावार हे अतिशय समृद्ध परंपरा असलेल्या आणि हिरक महोत्सव वाटचाल करणाऱ्या महाविद्यालयातील परीक्षा सुव्यवस्थित चालू असल्याने समाधान व्यक्त केले आहेत.